विशेष शाखा, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे - ३३
दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी -dcphq.pcpc-mh@gov.in

जा.क्र/ पो.आ / /२०२३, पिंपरी चिंचवड, 12CC450 दि. ०३/०८/२०२३

**प्रतिबंधात्मक आदेश..**

विषय :- फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४(१) नुसार मा.श्री अमित शाह गृहमंत्री,भारत सरकार यांचा पिंपरी चिंचवड दौरा, दरम्यान पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये पॅराग्लायडींग, पॅरामोटर्स, हँग ग्लायडर्स , मायक्रो लाईट एअरोप्लेन, हॉट एअर बलुन, प्रायव्हेट हेलिकॉप्टर यांचे उड्डाण व ड्रोन द्वारे छायाचित्रीकरण (शुटिंग) करण्यास प्रतिबंधात्मक आदेश.

-----०००-----

ज्याअर्थी, अतिमहत्वाची व्यक्ती मा.श्री अमित शाह गृहमंत्री,भारत सरकार हे दिनांक - ०६/०८/२०२३ रोजी रोजी पिंपरी चिंचवडच्या दौ-यावर येत असून भेटीदरम्यान चिंचवड पोलीस ठाणे हद्दीतील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चिंचवड पुणे येथील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

अतिमहत्वाची व्यक्ती मा.श्री अमित शाह गृहमंत्री,भारत सरकार यांना नक्षलवादी संघटना, अतिरेकी संघटना अशा अनेक संघटनापासून जिवीतास धोका असल्याने व त्यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी त्यांच्याबरोबर इतर महत्वाचे व्हीव्हीआयपी असल्याने त्यांचे दौ-याचे अनुषंगाने पॅराग्लायडींग, पॅरामोटर्स, हँग ग्लायडर्स, मायक्रो लाईट एअरोप्लेन, हॉट एअर बलुन, प्रायव्हेट हेलिकॉप्टर यांचे उड्डाण व ड्रोन द्वारे छायाचित्रीकरणामुळे धोका निर्माण होऊ शकतो. तसेच अलीकडच्या काळातील वाढते दहशतवादी हल्ल्यांचा व घातपात कारवायांचा विचार करता ड्रोन सारखे इलेक्ट्रिक साधनांचा वापर करुन घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जम्मू काश्मिर मध्ये स्फोटके भरलेले दोन ड्रोन जम्मू विमानतळावरील भारतीय विमान स्टेशनवर आदळली, ज्यामुळे इमारतीच्या छताला छोटया प्रमाणात क्षती पोहोचली, दुसरे ड्रोन मोकळया जागी आदळले. अशा प्रकारे काश्मीर मध्ये ड्रोन वापरुन बॉम्ब हल्ला करण्यात आलेला आहे. या पार्श्वभुमीवर घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी केलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन मा.श्री अमित शाह गृहमंत्री,भारत सरकार यांचे पिंपरी चिंचवड, रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह या ठिकाणाच्या भेटीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये दि.०५/०८/२०२३ रोजीचे ००/०० ते दि. ०६/०८/२०२३ रोजीचे मध्यरात्री २४/०० वा. पर्यंतच्या कालावधीत सुरक्षेच्या कारणास्तव पॅराग्लायडींग, पॅरामोटर्स, हँग ग्लायडर्स, मायक्रो लाईट एअरोप्लेन, हॉट एअर बलुन, प्रायव्हेट हेलिकॉप्टर यांचे उड्डाण व ड्रोन द्वारे छायाचित्रीकरण (शुटिंग) करण्यास व कोणत्याही प्रकारचे ड्रोन उडविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश दि ०४/०८/२०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

तारीख- ०४/०८/२३
ठिकाण- पिंपरी चिंचवड.

पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड

५/८

( विनय कुमार चौबे )
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड